नि.दि.दावा क्र. १६८/२०२१
सुधाकर कुलकर्णी वि.जयंत कुलकर्णी व इतर

## निशाणी क्र.६५ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१७ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१७ यांचे म्हणणे असे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर दाव्याचे कामी लेखी म्हणणे, कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१७ यांचे कथन असे की, प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी दावा मिळकतीपैकी गट क्र.२७६/१/अ, क्षेत्र १६ हे. २९ आर. बाबत विक्री संदर्भात व्यवहार सुरु केल्याचे निदर्शनास आल्याने प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल करुन दाद मागितली आहे. प्रतिदावा प्रलंबित असताना प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी प्रतिदाव्यातील वादीचे म्हणजेच प्रतिवादी क्र.१७ यांचे हक्क डावलून वरील मिळकत सिध्देश्वर दत्तात्रय चव्हाण वगैरे यांना दि.०९/१२/२०२१ रोजी नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.५५३९/२०२१ ने दिली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१७ यांनी प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिदाव्यातील सरनाम्यात अर्जात नमुद प्रमाणे प्रतिवादी क्र.१६ नंतर प्रतिवादी क्र.१७ ते २० म्हणुन समाविष्ट करण्याची, प्रतिदाव्यात प्रतिदावा कलम २ नंतर २(अ) हा अर्जात नमुदप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्याची व विनंती कलम ७क मध्ये प्रतिवादी क्र.१ ते १६ ऐवजी प्रतिवादी क्र.१ ते २० अशी दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे. सदरची दुरुस्ती मंजुर होणे न्यायाच्या दृष्टीने जरुरीचे आहे अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ ते १६ व प्रतिवादी क्र.२३ ते २६ यांनी प्रतिवादी क्र.१७ चे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी प्रतिवादी क्र.१७ चा प्रस्तुत अर्ज चालण्याजोगे नसल्याचे सांगितले आहे. प्रतिवादींचे कथन असे की, प्रस्तुत प्रतिवादी हे दाव्यात

पक्षकार नाहीत त्यामुळे अर्ज कायद्याने चालु शकत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१७ चा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१८ व १९ व वादी यांनी प्रतिवादी क्र.१७ चे अर्जास म्हणणे दाखल केले आहे व योग्य तो न्यायाचे आदेश होण्याची विनंती केली आहे.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले.

०६. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०७. एकंदरीत प्रतिवादी क्र.१७ चा अर्ज पाहिला असता असे दिसते की, प्रतिवादी क्र.१७ हे स्थावर मिळकतीच्या अनुषंगाने दाव्यामध्ये काही मजकुर समाविष्ट करण्यासाठी परवानगी मागत आहेत. प्रतिवादी क्र.१७ कथनाप्रमाणे दाव्याचे कामकाज सुरु असताना प्रततिवादी क्र.१ ते १६ यांनी दावा मिळकतीपैकी गट क्र.२७६/१/अ, क्षेत्र १६ हे. २९ आर. इतके क्षेत्र प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१७ ते २० यांना विक्री केलेली आहे व त्याअनुषंगाने प्रतिदाव्यात अर्जात नमुदप्रमाणेची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. या कथनापुष्टयर्थ प्रतिवादी क्र.१७ ने प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी नमुद केलेले कारण म्हणजेच प्रस्तुत प्रतिवादी यांचे कब्जेवहिवाटीस दावा मिळकत नाही हे कथन दोन्ही बाजुंच्या पक्षकारांना संधी देवून सविस्तर पुराव्यानंतर सिध्द होणारे आहे. दुरुस्तीचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसुन येते.

०८. दुरुस्तीचे स्वरुप पाहता, ती जर मंजुर केली तर प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा हा गुणवत्तेवर चालण्यास मदत होणार आहे. अशा परीस्थितीत नियोजित दुरुस्ती कोणत्याही प्रकारे त्यांचे हक्कांवर बाधा आणेल असे दिसत नाही.

०९. सबब, एकंदरीत परीस्थितीचा विचार करता न्यायालयीन गुंतागुंतीची प्रक्रिया टाळण्यासाठी प्रतिवादी क्र.१७ ला अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचे अवलोकन करुन मी खालीलप्रमाणे

आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.६५ खर्चासह मंजुर करण्यात येते.

२. प्रतिवादी क्र.१७ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मागणी प्रमाणेची दुरुस्ती १४ दिवसांचे आत करुन आवश्यक तेवढया दुरुस्त प्रतिदाव्याच्या प्रती ताबडतोब याकामी दाखल कराव्यात.

३. प्रतिवादी क्र.१७ ते २० यांना प्रतिवादी क्र.१७ यांनी दुरुस्ती केल्यानंतर प्रतिदाव्याचे समन्स काढण्यात यावे.

दिनांकः– ०६.१२.२०२३.

(श्रीमती पी.एस.गोवेकर)
सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : A. S. Bakale |
| Court | : 2nd Jt. Civil Judge J. D. & J.M.F. C., Mohol. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 06.12.2023 |
| Judgment / Order uploaded on | : 06.12.2023 |